महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ७० वा | दिनांक : १०/१२/२०२४ | वार : मंगळवार

## विधानसभेतून स्वातंत्र्यवीर सावरकरांचा फोटो हटवणार : कर्नाटक सरकारचा निर्णय





**मुंबई :** महाराष्ट्र कर्नाटक सीमावादाने पुन्हा एकदा डोके वर काढले आहे. महाराष्ट्र एकीकरण समितीने मराठी भाषकांसाठी बेळगाव येथे मेळावा आयोजित केला होता. त्याला कर्नाटक सरकारने विरोध दर्शवला तसेच पोलिसांनी जमावबंदी देखील लागू केली होती. जमावबंदीचे उल्लंघन केल्यास कारवाईचा इशारा देखील देण्यात आला. त्यातच आता कर्नाटक सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. विधानसभेत असलेला स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा फोटो हटवण्याचा निर्णय येथील कॉंग्रेस सरकारने घेतला असल्याचे बोलले जात आहे.

कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरमैया यांच्या नेतृत्वातइल कॉंग्रेस सरकारने बेळगावच्या सुवर्ण सौधा विधानसभेतून स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा फोटो हटवण्याचा निर्णय घेतला आहे. सावरकरांचे कर्नाटकसाठी कोणतेही योगदान नाही असे सरकारला वाटत असल्याने त्यांनी हा निर्णय घेतला असल्याचे बोलले जात आहे. बसवराज बोम्मई यांच्या नेतृत्वातील सरकारने विधानसभेत सावरकरांचा फोटो लावला होता. आता कॉंग्रेस सरकारच्या या निर्णयावरून सावरकर यांचे पणतू रणजित सावरकर यांनी तीव्र निषेध व्यक्त केला आहे.

रणजित सावरकर म्हणाले, कॉंग्रेसकडून या पेक्षा काही वेगळी अपेक्षा नव्हती. मात्र या निर्णयाची त्यांना मोठी किंमत चुकवावी लागले. कॉंग्रेस टिपू सुलतान यांचे कौतुक करते, अशी टीका रणजित सावरकर यांनी केली आहे. तसेच भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी देखील यावर प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी ट्विट करत म्हंटले की, हा निर्णय अत्यंत निंदनीय आणि भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा अपमान करणारा आहे.

भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे ट्विट करत म्हणाले, 'कर्नाटकातील कॉंग्रेस सरकारनं विधानसभा सभागृहातून स्वातंत्र्यवीर सावरकर यांची प्रतिमा काढून टाकण्याचा निर्णय घेतला.हा निर्णय अत्यंत निंदनीय आणि भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा अपमान करणारा आहे.स्वातंत्र्यवीर सावरकरांनी भारतमातेच्या स्वातंत्र्यासाठी भोगलेल्या यातना, त्यांचे बलिदान आणि त्यांचे विचार यांची अवहेलना करण्याचा कॉंग्रेसचा हा डाव आहे. सत्तेसाठी लाचार झालेले आणि मतांसाठी हिंदुत्ववादी भूमिका सोडलेले उद्धव ठाकरे याचा निषेध करणार की नेहमीप्रमाणे मूग गिळून गप्प बसणार? असा सवाल देखील त्यांनी उपस्थित केला आहे.

पुढे बावनकुळे म्हणतात, कॉंग्रेससोबत आघाडी करताना उद्धव ठाकरे यांनी सावरकरांच्या विचारांना मूठमाती दिली आहे. त्यामुळेच आज त्यांना 'टीपू सेना' म्हणण्याची वेळ आली आहे.स्वातंत्र्यवीर सावरकरांचे विचार अमर आहेत, त्यांचा अपमान करणाऱ्या कॉंग्रेस आणि त्यांच्या साथीदारांना इतिहास कधीही माफ करणार नाही, असे चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.

## युपीएससी मुख्य परीक्षेचा निकाल जाहीर




**नवी दिल्ली :** केंद्रीय लोकसेवा आयोग म्हणजेच UPSC ने नागरी सेवा परीक्षा (CSE) मुख्य २०२४ चा निकाल जाहीर केला आहे. परीक्षेला बसलेले उमेदवार अधिकृत वेबसाइट upsc.gov.in वर त्यांचे निकाल पाहू शकतात. मुख्य परीक्षा उत्तीर्ण झालेले उमेदवार आता मुलाखतीसाठी जातील.

मेन्स उत्तीर्ण झालेल्या सर्व उमेदवारांना आता मुलाखतीच्या फेरीतून जावे लागेल. हे सर्व उमेदवार १३ डिसेंबर ते १९ डिसेंबर या कालावधीत डिटेल्स अर्ज (DAF) भरतील. या आधारावर त्यांची दिल्लीतील यूपीएससीमध्ये मुलाखत होणार आहे. UPSC लवकरच अधिकृत वेबसाइटवर मुलाखतीच्या तारखा जाहीर करेल.

आयोगाने जारी केलेल्या नोटीसमध्ये असेही म्हटले आहे की, जे उमेदवार त्यांचे ई-समन्स पत्र डाउनलोड करू शकत नाहीत त्यांनी तत्काळ आयोगाच्या कार्यालयाशी पत्राद्वारे किंवा ०११-२३३८५२७१, ०११-२३३८११२५, ०११-२३०९८५४३ या दूरध्वनी क्रमांकांवर संपर्क साधावा. याशिवाय उमेदवार आयोगाशी फॅक्स क्रमांक 011-23387310, 011-23384472 आणि ई-मेल csm-upsc@nic.in वर संपर्क साधू शकतात. आयोगाकडून मुलाखतीसाठी कोणतेही पेपर समन्स पत्र पोस्टाद्वारे जारी केले जाणार नाही.

मुलाखतीनंतर, अंतिम निकाल जाहीर झाल्यापासून १५ दिवसांच्या आत सर्व उमेदवारांच्या मार्कशीट आयोगाच्या वेबसाइटवर अपलोड केल्या जातील. ते ३० दिवसांसाठी वेबसाइटवर उपलब्ध असेल.

UPSC ने १४ फेब्रुवारी २०२४ रोजी UPSC CSE २०२४ ची अधिसूचना जारी केली होती. यासाठी अर्ज करण्याची अंतिम तारीख ५ मार्च २०२४ होती. प्रिलिम्स परीक्षेची तारीख १६ जून २०२४ रोजी होती. याआधी २६ मे रोजी प्रिलिम होणार होती, जी लोकसभा निवडणुकीमुळे पुढे ढकलण्यात आली होती.

UPSC CSE परीक्षा तीन टप्प्यात घेतली जाते: पूर्व, मुख्य आणि मुलाखत. १६ जून २०२४ रोजी प्रिलिमनंतर मुख्य परीक्षा २०, २१, २२, २८ आणि २९ सप्टेंबर २०२४ रोजी घेण्यात आली.

## संजय मल्होत्रा रिजर्व बँक ऑफ इंडियाचे नवे गव्हर्नर



**नवी दिल्ली :** सरकारने महसूल सचिव संजय मल्होत्रा यांची भारतीय रिझर्व्ह बँकेचे (RBI) नवे गव्हर्नर म्हणून नियुक्ती केली आहे. ते RBI चे २६ वे गव्हर्नर असतील आणि सध्याचे गव्हर्नर शक्तीकांत दास यांची जागा घेतील.

दास यांचा कार्यकाळ १० डिसेंबर २०२४ रोजी संपत आहे. मल्होत्रा ११ डिसेंबरपासून गव्हर्नरपदाचा कार्यभार स्वीकारणार आहेत. मंत्रिमंडळाने आज ९ डिसेंबर रोजी संजय मल्होत्रा यांच्या नियुक्तीला मान्यता दिली आहे.

१२ डिसेंबर २०१८ रोजी शक्तिकांत दास यांना गव्हर्नर बनवण्यात आले. त्यानंतर त्यांचा कार्यकाळ आणखी तीन वर्षांसाठी वाढवण्यात आला. त्यांनी उर्जित पटेल यांची जागा घेतली होती.

मध्यवर्ती बँक कठीण परिस्थितीत असताना नवीन गव्हर्नर पदभार स्वीकारत आहेत. जुलै-सप्टेंबर या कालावधीत विकास दर ५.४% च्या सात-तिमाहीतील नीचांकी पातळीवर गेल्याने RBI वर व्याजदरात कपात करण्याचा दबाव वाढत आहे. दास यांच्या नेतृत्वाखाली, RBI ने महागाईच्या जोखमीचा हवाला देत जवळजवळ दोन वर्षे व्याजदर अपरिवर्तित ठेवले आहेत.

संजय मल्होत्रा, १९९० च्या बॅचचे भारतीय प्रशासकीय सेवा (IAS) राजस्थान केडरचे अधिकारी आहेत, त्यांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (IIT) कानपूर मधून कॉम्प्युटर सायन्समध्ये अभियांत्रिकी पदवी आणि यूएसएच्या प्रिन्सटन विद्यापीठातून सार्वजनिक धोरणात पदव्युत्तर पदवी प्राप्त केली आहे.

मल्होत्रा यांनी ऊर्जा, वित्त आणि कर, माहिती तंत्रज्ञान आणि खाणी यासह विविध क्षेत्रात काम केले आहे. त्यांना ३३ वर्षांपेक्षा जास्त अनुभव आहे.

वित्त मंत्रालयात सचिव (महसूल) म्हणून काम करण्यापूर्वी, त्यांनी भारत सरकारच्या वित्त मंत्रालयाच्या अंतर्गत वित्तीय सेवा विभागात सचिव पदावर काम केले. मल्होत्रा यांच्याकडे राज्य आणि केंद्र सरकार या दोन्ही स्तरांवर वित्त आणि करप्रणालीत कौशल्य आहे.

अर्थविषयक बाबींमध्ये मल्होत्रा यांची गणना सुधारक आणि मजबूत काम करणाऱ्या अधिकाऱ्यांमध्ये केली जाते. त्यांना राजस्थानातील जवळपास सर्वच विभागात काम करण्याचा अनुभव आहे. केंद्रातील अर्थ मंत्रालयात काम केले आहे. ते मूळचे राजस्थानचेच आहेत. मल्होत्रा यांची गणना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवडत्या अधिकाऱ्यांमध्ये केली जाते.

ते कोणत्याही विषयावर काम करण्यापूर्वी त्यावर विस्तृत संशोधन करतात. उद्यानात फिरताना किंवा फिरत असतानाही ते इंटरनेटवरून काहीतरी शोधत, ऐकत आणि पाहत राहतात. मुख्यमंत्र्यांसमोर प्रेझेंटेशन देतात, तेव्हा ते संशोधनाचा हवाला देतात. अशा परिस्थितीत त्यांच्या बोलण्याचा आणि विचारांचा खोलवर परिणाम प्रत्येक सभेत दिसून येतो.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १० डिसेंबर २०२४


## डॉ. बी. जी. गायकवाड यांना महाराष्ट्ररत्न राष्ट्रीय पुरस्कार प्रदान




महाराष्ट्रातील सामाजिक, संस्कृतीक, राजकीय, शैक्षणिक, क्रीडा, अशा सर्वच क्षेत्रात कार्य करणारे अष्टपैलू व्यक्तिमत्व असणारे कवी, कथाकार, लेखक, साहित्यक यांना अनुश्री महिला बहुउद्देशीय सामाजिक तथा शैक्षणिक संस्था भुसावळ यांच्या वतीने भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त महाराष्ट्रातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या लोकांच्या कार्यास गती मिळावी प्रेरणा मिळावी त्यामधून समाजामध्ये नवचैतन्य निर्माण व्हावे यामधून नवीन परिवर्तन समाजाची निर्मिती व्हावी या हेतूने दरवर्षी राज्यस्तरीय महाराष्ट्र रत्न गुणगौरव पुरस्कार प्रदान केले जातात.

8 डिसेंबर रोजी शहरातील कृष्णाचंद्र सभागृह रेल्वे स्टेशन जवळ सकाळी दहा ते पाच वाजेपर्यंत राज्यस्तरीय पुरस्कार २०२४ चे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमात सामाजिक कार्यात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून प्रवक्ता तथा संचालक लाड बुद्धा टीव्ही चॅनलचे भैय्याजी खैरकर शहरातील हृदयरोग तज्ञ तथा समाजसेवक डॉ. राजेश

## वर्धापन दिनानिमित्त मनपाच्या वाहनांचे शहरात संचालन

**छत्रपती संभाजीनगर :** दि. ०८ डिसेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या ४२ व्या वर्धापन दिनानिमित्त महापालिकेच्या सेवेत शामिल वाहनांच्या संचालन करण्यात आले. सदरील संचलनचे उद्घाटन महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांनी यांत्रिकी विभाग सेंट्रल नाका येथे हिरवा झेंडा दाखवून केले. यावेळी शहर अभियंता ए बी देशमुख, मुख्य लेखापरीक्षक शि बा नाईकवाडे, कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) अमोल कुलकर्णी, जनसंपर्क अधिकारी अहमद तौसीफ यांची उपस्थिती होती.सदरील संचालनची सुरुवात सेंट्रल नाका येथून झाली तर सेवन हिल, मुकुंदवाडी, चिकलठाणा, सिडको बसस्थानक, जळगाव रोड, हर्सुल टी पॉइंट, दिल्ली गेट, बसस्टँड, बाबा पेट्रोल पंप, रेल्वे स्टेशन,महानुभाव चौक, बीड बायपास, शहानूर मियां दर्गा, सुत गिरणी चौक, सेवन हिल, क्रांती चौक, महावीर चौक, बसस्टँड मार्गे आमखास मैदान येथे समारोप झाले.सदरील संचलनात महापालिकेतील ३० प्रकारची वाहनांचा समावेश होता. सदरील संचलनचे उद्देश नागरिकांना महापालिकेची क्षमता तसेच त्यांच्या सेवेत किती प्रकारचे वाहने उपलब्ध आहे याची जाणीव करून देणे हा होता.सदरील वाहनांचे संचालनात जेसीबी, हुकलोडर, रुग्णवाहिका, टिपर, ट्रॅक्टर लोडर व इतर वेगवेगळ्या जड आणि अजड वाहनांच्या समावेश होता.जेव्हा सदरील संचालन आयुक्त बंगल्या (जलश्री) मार्गे जात होता तेव्हा आयुक्त जी श्रीकांत यांनी परिवारासह रोडवर येऊन संचालनाचे पुष्पपांखळ्याने स्वागत केले.

## पिशोर पोलीसांनी टाकलेल्या छाप्यात प्रतिबंधित गुटखा जप्त




**कन्नड (अरुण थोरात):** पिशोर पोलीस ठाणे पथकाने दि. ८ डिसेंबर रोजी टाकलेल्या धाडीत प्रतिबंधित गुटखा व सुगंधी तंबाखू चा साठा जप्त करण्यात आला आहे.पिशोर पोलीसां गोपनिय माहिती मिळाली की पिशोर गावातील अक्रम शहा अस्लम शहा हा इसम प्रतिबंधित गुटखा व सुगंधी तंबाखू साठवून व विक्री करीत आहे. त्यावरुण पोलीस पथकाने रात्री ०९:१० वाजता अक्रम शहा अस्लम शहा व त्याचा भाऊ बब्बु शहा अस्लम शहा यांच्या दुकान व राहत्या घरावर छापा मारला असता. प्रतिबंधित गोवा गुटखा १४६ पाकिटे, विमल पानमसाला ७९ पाकिटे, राजनिवास पान मसाला १२९ पाकिटे, विमल पान मसाला ४९ पाकिटे, झेड एल-०१ सुगंधीत तंबाखू १३८ पाकिटे, व्ही-१ सुगंधीत तंबाखू ३५ पाकिटे असा एकुण सुमारे १६८६४७ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. मात्र दोन्ही आरोपी पळून जाण्यात यशस्वी झाले. याबाबत माहिती अन्न सुरक्षा अधिकारी छ.संभाजीनगर यांच्याशी पत्रव्यवहार करुण माहिती देण्यात आली.

दि. ९ डिसेंबर रोजी अन्न सुरक्षा अधिकारी प्रशांत शशिकांत कुचेकर यांनी दिलेल्या तक्रारी वरुण आरोपी अक्रम शहा अस्लम शहा (वय ३७ वर्ष) रा. पिशोर ता.कन्नड याच्या विरुध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आली आहे.

सदरील कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक विनयकुमार राठोड, अप्पर पोलीस अधीक्षक सुनील लांजेवार, उपविभागीय पोलीस अधिकारी विजयकुमार ठाकुरवाड यांच्या मार्ग-दर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजी नागवे, उपनिरीक्षक विश्वजीत फरताडे, पोलीस हवालदार पंढरी इंगळे, परमेश्वर दराडे, विलास सोनावणे, दत्तु लोखंडे, वसंत पाटील, गजानन कर्हाळे, किरण गंडे, अंमलदार विजय भोटकर, गणेश कवाळ, करण म्हस्के, कौतिक सपकाळ, रेणुका मालोदे यांनी पार पाडली.

## शालेय क्रीडा स्पर्धेतून शारीरिक संघटनात्मक विकास होतो




**कन्नड (अरुण थोरात) :** शालेय क्रीडा स्पर्धेतून विद्यार्थ्यांचा शारीरिक, बौद्धिक व संघटनात्मक विकास होतो. त्यामुळे शालेय जीवनातून विद्यार्थ्यांनी किमान एक तरी खेळ खेळावा व आपले करिअर घडावं असे अवाहन क्रिडा समिती समन्वयक तथा प्रशिक्षक प्रविण शिंदे यांनी केले आहे. ते फातिमा कानव्हेंट कन्नड येथील आयोजित क्रिडा स्पर्धाच्या उदघाटन प्रसंगी बोलत होते. ते पुढे म्हणाले की, खेळाडू साठी जिल्हास्तर, विभाग, राज्यस्तर दहावी व बारावी साठी मार्क व राज्य खेळाडू प्रथम क्रमांक द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्तांसाठी नोकरीत आरक्षण आहे. त्याबाबत खेळाडूंसाठी शासनाने परिपत्रक काढलेले आहे. याचा खेळाडूंनी लाभ घ्यावा असे ही ते म्हणाले कन्नड येथील फातिमा कॉन्व्हेंट माध्यमिक शाळेच्या वार्षिक क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटन समारंभ प्रसंगी शाळेच्या मॅनेजर सिस्टर मिलाग्रीन, हायस्कूल मुख्याध्यापिका सिस्टर लीडा अबलीन रोडरिगस, प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सिस्टर प्रमिला, सुपरवाझर सिस्टर रेबेका, सिस्टर आमला, सिस्टर जोना आदी उपस्थित होत्या. यावेळी व्हॉलीबॉल, कबड्डी, खो-खो, थ्रो बॉल, रिले १०० मीटर धावणे आदी स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. स्पर्धा क्रीडा शिक्षक विशाल दांडेकर, उमेश टेकाळे, राहूल गावंडे, सचिन शेलार, सुशीला दांडगे, मिस. गुलनार कुरेशी, ज्योती देशमुख, अर्चना पाटील, स्वप्नाली निकम, मिस. अश्विनी देशमुख, मिस बिन्नी, मिस. अश्लेषा चव्हाण, मिस.प्रियांका भदाणे, प्रमोद खंडागळे, प्रमोद क्षीरसागर आदीं परिश्रम घेत आहेत. स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यात येणार आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १० डिसेंबर २०२४

## राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत तरुणाईने मांडले संविधान, रोजगार, शिक्षण, शेतकरी प्रश्नांवर परखड मत



**अकोला :** "छत्रपती करंडक' या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत राज्यभरातील १२५ स्पर्धकांनी सहभाग नोंदवत संविधान, शेतकरी आत्महत्या, अर्थव्यवस्था, राजकारण अशा विविध विषयांवर आपले परखड मत मांडले. छत्रपती करंडक-२०२४ ची विजेता नाशिक येथील कोमल नरेंद्र शेलार ही विद्यार्थिनी ठरली. ही स्पर्धा शिवाजी महाविद्यालयाच्या वसंत सभागृहात पार पडली.

संविधानाचा अमृत महोत्सव साजरा करताना, सावधान... उभ्या देशाची राख होत आहे, कृषिप्रधान भारताचे भयावह वास्तव, खासगीकरण मार्गे पुढे धोका आहे?, महाराष्ट्र मरता उभे राष्ट्र मरते, भारत माता सांगा ना मी कुठे सुरक्षित आहे?, अर्थव्यवस्थेचा काही अर्थ लागे ना, राजकारण : काल, आज आणि उद्या.. अशा विषयांवर आपले परखड मत स्पर्धकांनी मांडले. उद्घाटन शेतकरी सत्तार कुरेशी यांच्या हस्ते पार पडले. यावेळी प्राचार्य डॉ. रामेश्वर भिसे, शेतकरी जागर मंचाचे संयोजक प्रशांत गावंडे, प्रा. मधू जाधव उपस्थित होते. प्रास्तविक प्रतीक दुतोंडे यांनी केले. सूत्रसंचालन गणेश राऊत तर आभार गौरी सरोदे यांनी मानले. बक्षीस वितरण समारंभाला प्रफुल्ल गुडधे, आसिफ खान उपस्थित होते. समारोपीय कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार अक्षय राऊत यांनी मानले.

लहान वयोगटातील स्पर्धा रंजक ठरली. अवघ्या पाच वर्षाच्या आराध्या खिल्लारी या चिमुकलीच्या भाषणाने श्रोत्यांची मने जिंकली. स्पर्धेत ५५ शालेय गटातील स्पर्धकांनी विविध विषयांवर आपले विचार मांडले. अवघ्या चार वर्षात छत्रपती करंडक या स्पर्धेने राज्यभरात नावलौकिक प्राप्त केला आहे, असे प्रमुख अतिथी म्हणाले. छत्रपती करंडक आयोजन समितीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून या स्पर्धेला एक वेगळी उंची प्राप्त करून दिली. राज्यातील कानाकोपऱ्यातून स्पर्धक या स्पर्धेला हजेरी लावत असतात. आता ही स्पर्धा राज्यस्तरीय न ठेवता, राष्ट्रीय स्तरावर आयोजन करावे, असेही मत प्रमुख अतिथी म्हणाले. वक्तृत्व स्पर्धेत विशेष पारितोषिकेही देण्यात आली. यात वेदस संदीप देशमुख, आराध्या पंकज खिल्लारी, श्रीयोग दिगंबर पाचपोर, युवराज योगेश उमाळे यांना पारितोषिक देण्यात आले.

कोमल नरेंद्र शेलार (नाशिक) - छत्रपती करंडक ११,१११ रोख, खलिता, मानाचा फेटा बहाल करण्यात आला. अन्य विजेत्यांमध्ये वृषभ सुनील चौधरी (पुणे) प्रथम क्रमांक, ७००४ रोख, यश रवींद्र पाटील (रायगड) - द्वितीय क्रमांक - ५००४ रोख, बुशारा शकील सोरठीया (छत्रपती संभाजीनगर) - तृतीय क्रमांक - ३००४ रोख, अभय कृष्णकांत आळशी (मुंबई) - चतुर्थ क्रमांक - २००४ रोख, महेश जनार्धन उशीर (अहमदनगर) - पंचम क्रमांक- १००४ रोख, कौस्तुभ गणेश पाचडे (वर्धा) - उत्तेजनार्थ १ - ७०४ रोख, श्रुती गजेंद्र जाधव (धाराशिव) - उत्तेजनार्थ २- ७०४ रोख, आदित्य ज्ञानेश्वर दराडे (छत्रपती संभाजीनगर)-३- ७०४ रोख, मयुरी राजेश वहाने (अकोला) - उत्तेजनार्थ ४- ७०४ रोख रुपयांचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

## आमदाराच्या मामाचा खून : अज्ञातांनी भर चौकातून नेले होते उचलून

**पुणे :** पुण्यात भाजप आमदार योगेश टिळेकर यांच्या मामाचे अपहरण करत नंतर खून केला असल्याची माहिती समोर आली आहे. योगेश टिळेकर यांच्या अपहरण झालेले मामा सतीश वाघ यांचा खून झाला असून यवत गावच्या हद्दीत मृतदेह सापडला आहे. टिळेकर यांचे मामा योगेश वाघ फिरण्यासाठी निघाले असता शेवाळवाडी येथून त्यांचे अपहरण करण्यात आले होते. एका चारचाकी वाहनातून आलेल्या लोकांनी त्यांना गाडीत टाकून नेले. याप्रकरणी हडपसर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सतीश वाघ हे आज सकाळच्या सुमारास सोलापूर रस्त्यावरील एका हॉटेलजवळ थांबले होते. यावेळी एक चारचाकी गाडी त्यांच्याजवळ आली. त्यातून दोघे जण खाली उतरले. दोघांनी सतीश वाघ यांच्याकडे कशाबद्दल तरी विचारपूस करण्याचे नाटक केले. बोलत असतानाच अपहरणकर्त्यांनी सतीश वाघ यांना जबरदस्तीने गाडीत बसवले. त्यानंतर ते निघून गेले. दरम्यान, सतीश वाघ यांचे अपहरण का करण्यात आले? यामागे वैयक्तिक किंवा राजकीय वैमनस्यातून हे कृत्य करण्यात आले का? याबाबत पोलिसांकडून तपास सुरू करण्यात आला आहे.

हॉटेलच्या सीसीटीव्हीत घटना कैद बराच वेळ झाला, तरी सतीश वाघ घरी न आल्यामुळे त्यांच्या मुलाने त्यांचा शोध घेण्यास सुरुवात केली. सर्वत्र शोधाशोध केल्यानंतरही ते सापडत नसल्याने त्यांच्या मुलाने हडपसर पोलिस ठाणे गाठत पोलिसांत तक्रार दिली. यानंतर हडपसर पोलिसांनी सतिश वाघ यांचा शोध घेण्यास सुरुवात केली. तपासादरम्यान, सोलापूर रोडवरील हॉटेल ब्ल्यू बेरी हॉटेलचे सीसीटीव्ही कॅमेरे तपासले असता काही अज्ञात सतीश वाघ यांचे गाडीतून अपहरण करत असल्याचे दिसून आले. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलिसांकडून या प्रकरणाचा सखोल तपास केला जात आहे.

पोलिस प्रशासन करतेय काय? पुण्यातील गुन्हेगारी थांबण्याचे नाव घेत नाहीये. काही आठवड्यांपूर्वी राष्ट्रवादीच्या नेत्याची गोळ्या घालून हत्या झाली होती. विशेष म्हणजे आरोपींनी त्यांना भरचौकात गोळ्या घातल्या होत्या. त्यानंतर आज थेट लोकप्रतिनिधीच्या नातेवाईकाचे भर चौकातून अपहरण करण्यात आले. लोकप्रतिनिधींचे नातेवाईकच सुरक्षित नसतील, तर सामान्य नागरिकांचे काय? गुन्हेगारी वाढत असताना पोलिस प्रशासनावर प्रश्न उपस्थित होत आहेत. पुण्यातील गुन्हेगारीला आळा बसणार का? असा सवाल सामान्य नागरिकांना भेडसावत आहे.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

Sanitary Health Inspector

सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002